



श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe इयत्ता – चौथी (3 जुलै) माझा अभ्यास Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस तिसरा :






स्वयंमूल्यमापन चाचणी 7 तारखेला असेल.

ब्रीज कोर्ससोबत चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट (वापरणे सक्ती नाही.)

कविता समजून घ्या व तालासुरात म्हणा.

टेस्ट सोडवा

सराव

## १. धरतीची आम्ही लेकरं

कविता पहा

• ऐका. म्हणा. वाचा.

धरतीची आम्ही लेकरं । भाग्यवान ।
धरतीची आम्ही लेकरं ।। ध्रु. ।।

शेतावर जाऊया । सांगाती गाऊया ।
रानीवनी गाती जशी रानपाखरं ।। १ ।।


मेहनत जिमनीवरी । केली वरीसभरी ।
आज आलं फळ त्याचं डुले शिवार ।। २ ।।

शाळु, जुंधळा मोती । चमचम चमकत्याती ।
मोत्यांची सालभरी खाऊ भाकर ।। ३ ।।

स्थापू समानता, पोलादी ऐक्यता ।
नाही धनी येथ कुणी, नाही चाकर ।। ४ ।।

धरतीची आम्ही लेकरं । भाग्यवान ।
धरतीची आम्ही लेकरं ।।

– द. ना. गव्हाणकर




टेस्ट सोडवा

कोनाचे प्रकार समजून घ्या.

**काटकोन, लघुकोन, विशालकोन**


## सराव



खिडकीच्या लगतच्या दोन कडांमध्ये काटकोन दिसतो.




पुस्तकाच्या लगतच्या दोन कडांमध्ये काटकोन दिसतो.





प्रत्येक घड्याळात ३ वाजता व ९ वाजता तासकाटा व मिनिटकाटा एकमेकांशी काटकोन करतात.



बाजूच्या चित्रात दाखवल्याप्रमाणे कात्रीच्या दोन पात्यांमध्ये काटकोन आहे.



या कात्रीच्या दोन पात्यांच्या टोकांमधील अंतर हळूहळू कमी केले असता होणारा कोन हा काटकोनापेक्षा लहान होत जातो. काटकोनापेक्षा लहान कोनाला लघुकोन म्हणतात.



कात्रीच्या दोन पात्यांच्या टोकांमधील अंतर हळूहळू वाढवले असता होणारा कोन हा काटकोनापेक्षा मोठा होत जातो. काटकोनापेक्षा मोठ्या कोनाला विशालकोन म्हणतात.



काटकोन



लघुकोन




विशालकोन

टेस्ट सोडवा

## Understand the angles.

**Right angle, acute angle, obtuse angle**


revision



We see a right angle between two adjoining sides of a window.




Two adjacent sides of a book make a right angle.




In a clock, at 3 o'clock and 9 o'clock, the minute hand and the hour hand are at right angles to each other.



In the picture alongside, there is a **right angle** between the two blades of the scissors.



As we reduce the distance between the tips of the blades, little by little, the angle between the blades grows smaller than a right angle.
An angle which is smaller than a right angle is called an **acute angle**.



But, as we increase the distance between the tips of the blades the angle between the blades grows bigger than a right angle.
An angle that is bigger than a right angle is called an **obtuse angle**.



**A right angle**



**An acute angle**



**An obtuse angle**

**Circles 1**



**1. Listen carefully and act.**
लक्ष देऊन ऐका आणि त्याप्रमाणे कृती करा.

टेस्ट सोडवा




**Teacher :**
Form groups of ten.
Each group should stand in a circle.
One child in the circle will say, 'One'.
The second child will say, 'Two'.
The third child will say, 'Three'.
Continue like this up to the tenth child,
who will say, 'Ten'.
Now say the numbers faster and faster.





मुलांनी 1 ते 10 प्रमाणेच 100 पर्यंतचे कोणतेही दहा आकडे इंग्रजीत क्रमाने आणि भरभर म्हणायचे, असा सराव घ्यावा.







Now 2, 4, 6, 8 and 10 will step inside.
They will form another circle inside.
The two circles will stand facing each other.
Children facing each other will shake hands.



Now the inner/outer circle will turn right
and start moving.
Walk on till you come to the next child
and shake hands with him or her.
Then walk on and shake hands with the next child.
Stop when you come back to your first partner.
Give each other a high-five.





एकदा आतल्या व एकदा बाहेरच्या वर्तुळातील मुलांनी फिरून क्रमाक्रमाने नवीन जोड्या करून परत पहिल्या जोडीदाराकडे यायचे. या सर्व पायऱ्या गडबडगोंधळ न करता सर्व मुलांना सहज करता येईपर्यंत सराव घ्यावा.

टेस्ट सोडवा

## १. प्राण्यांचा जीवनक्रम

वाचा व समजून घ्या.

### रूपांतरण

शेळीचे करडू आणि शेळी यांच्यात सारखेपणा आहे. कोंबडीचे पिल्लू आणि कोंबडी यांच्यांतही सारखेपणा आहे; पण फुलपाखराची अळी आणि फुलपाखरू यांच्यांत मात्र खूपच फरक आहेत.

पिल्लू आणि पूर्ण वाढ झालेला प्राणी यांच्या रूपांत लक्षात घेण्याजोगी तफावत असणे, याला रूपांतरण म्हणतात.

### फुलपाखरांमधील रूपांतरण



सुंदर आकारांची आणि निरनिराळ्या रंगांची फुलपाखरे आपल्या परिसराचाच एक हिस्सा आहेत. फुलपाखरांचे जीवन वनस्पतींच्या सांनिध्यात जाते.

फुलपाखरांची वाढ होताना त्यामध्ये **अंडे, अळी, कोश आणि प्रौढ** या चार अवस्था असतात. त्यांतल्या प्रौढ अवस्थेला आपण फुलपाखरू म्हणतो.

बिबळ्या कडवा या नावाचे फुलपाखरू आपल्याकडे खूप मोठ्या प्रमाणावर आढळते. त्याच्या उदाहरणावरून फुलपाखरांची वाढ कशी होते, हे आपण पाहू.





बिबळ्या कडव्याची मादी रुईच्या पानावर अंडी घालते. अंड्यामधून सहा ते आठ दिवसांनी अळी बाहेर पडते. फुलपाखराच्या अळीला सुरवंट म्हणतात.



फुलपाखराचा सुरवंट अंड्यातून बाहेर पडतो, तेव्हा भुकेने प्रचंड वखवखलेला असतो. ज्या पानावर अंड्यातून तो बाहेर पडतो, तेच पान कुरतडून खायला तो सुरुवात करतो. त्याचा खाण्याचा वेग फार मोठा असतो. त्यामुळे त्याची वाढ खूप झपाट्याने होते.

- **नवा शब्द शिका**

**कात** – शरीराची वाढ होताना अपुरे पडणारे शरीरावरचे आवरण.

पहिल्या दोन ते अडीच दिवसांत बिबळ्या कडव्याचा सुरवंट इतका वाढतो, की त्याची कात त्याला पुरत नाही. पण जुन्या कातीच्या आत, वाढ झालेल्या शरीरावर नवीन कात येते. ती ढगळ

# स्वाध्याय सोडवा. १. शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र

टेस्ट सोडवा

स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) शिवाजी महाराज ज्या काळात होऊन गेले तो काळ ............ युगाचा होता.

(प्राचीन, मध्य, आधुनिक)

(आ) शिवाजी महाराजांनी ...............स्वराज्य निर्माण केले.

(महाराष्ट्रात, मध्यप्रदेशात, उत्तर प्रदेशात)

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) विजयनगरचा सम्राट | (१) निजामशाहा |
| (आ) अहमदनगरचा सुलतान | (२) आदिलशाहा |
| (इ) विजापूरचा सुलतान | (३) कृष्णदेवराय |
| | (४) सम्राट अकबर |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) प्रजेच्या कल्याणासाठी राज्य करणाऱ्या राजांची नावे लिहा.

(आ) शिवाजी महाराजांनी कोणते कार्य हाती घेतले?

(इ) शिवाजी महाराजांनी कोणाशी झुंज दिली ?

**४. वेगळा शब्द ओळखा.**

(अ) स्वराज्य, गुलामगिरी, स्वातंत्र्य.

(आ) रयत, प्रजा, राजा.

**उपक्रम**

(अ) तुमच्या वर्गात शिवजयंती साजरी करा.

(आ) शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात ऐतिहासिक गीते, पोवाडे यांचे सादरीकरण करा.

CJY07P





## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे वेब स्त्रोत-'ई-बालभारती' सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in